ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 12 | ISSUE - 2 | OCTOBER - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# १९ व्या शतकातील सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि शैक्षणिक सुधारणा चळवळ: एक अभ्यास




**डॉ. लदाफ शफिउद्दीन खजामैनोद्दीन,**
**सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, आझाद महाविद्यालय,औसा, जि. लातूर (महाराष्ट्र).**

## प्रस्तावना:

१८१८ मध्ये पेशवाईचा अस्त होऊन महाराष्ट्रावर ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना झाली. १८१८ नंतर कंपनीने पेशव्यांचे राज्य ताब्यात घेतल्यानंतर उर्वरित महाराष्ट्र ताब्यात घेण्यास प्रारंभ केला. ब्रिटिशांच्या सत्ता वर्चस्वाची ही प्रक्रिया १८६१ पर्यंत चालू होती. तेव्हा या भूप्रदेशाला 'मुंबई इलाखा' असे म्हटले जात होते. यात गुजरातचा काही भाग, खानदेश, बेळगाव, रत्नागिरी, कुलाबा, धारवाड, पंचमहाल हे सर्व प्रदेश समाविष्ट होते. लॉर्ड डलहौजी यांनी दत्तक वारसा नामंजूर करून सातारा, कोल्हापूर, नागपूर, इचलकरंजी, गगनबावडा, कापशी, विशाळगड, कागल, सावंतवाडी इत्यादी संस्थाने कंपनीच्या ताब्यात घेतली. एकंदरीत इ.स. १८६१ पर्यंत महाराष्ट्रावर कंपनीचे वर्चस्व प्रस्थापित झाले. कंपनीने प्रदेश ताब्यात घेतल्यानंतर त्यांनी येथे आमूलाग्र असा बदल घडून आणला. या बदलाचा परिणाम महाराष्ट्रात सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक जीवनावर फार मोठ्या प्रमाणात होऊ लागला. ब्रिटिशांनी शिक्षण प्रसारावर भर देऊन अनेक शैक्षणिक संस्था काढल्या, त्यामुळे महाराष्ट्रात पाश्चात्त्य विद्याविभूषित तरुणांची पिढी तयार झाली. ही पिढी आपल्या समाजव्यवस्थेकडे चिकित्सक दृष्टीने पाहण्यास सुरुवात करू लागली. १९ व्या शतकातील स्थितीची जाणीव या वर्गाला होती. येथे 'सामाजिक सुधारणांची फार गरज होती' असे नवशिक्षित तरुण वर्गाला वाटू लागले होते; आणि ब्रिटिश शासनव्यवस्थेकडून तशी प्रेरणाही मिळत होती. या प्रेरणेमुळे महाराष्ट्रात विविध सुधारकांनी विविध संस्था व संघटना स्थापन करून सुधारणा चळवळी सुरू केल्या. यांचे परिणाम म्हणून महाराष्ट्रात सामाजिक, धार्मिक, आर्थिक, संस्कृती इत्यादी क्षेत्रात सामाजिक सुधारणा होण्यास मदत झाली.[१]

## सामाजिक सुधारणा चळवळ:

१९ व्या शतकात महाराष्ट्रात अनेक जाती-उपजाती आणि धर्मपंथ अस्तित्वात होते. प्रत्येक जात-उपजातीतील लोक आपापल्या जात-उपजात व धर्मग्रंथांच्या प्रथेनुसार आचरण करीत होते. त्यामुळे समाजात सामाजिक विषमता निर्माण झाली होती. जाती-जातींमध्ये उच्च-नीचता, श्रेष्ठ-कनिष्ठ वर्गाची भावना अस्तित्वात होती. स्वतःला श्रेष्ठ मानणाऱ्या जाती, कनिष्ठ समजल्या जाणाऱ्या जातींवर अन्याय-अत्याचार करीत असत. त्यामुळे समाजात सामाजिक विषमता व निष्ठुरता वाढीस लागली. त्याचबरोबर समाजातील प्रत्येक व्यक्ती अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणारी, अर्थात अंधश्रद्ध होती. श्रद्धेमधूनच अंधश्रद्धा निर्माण झाली. भूत लागणे, करणी करणे, अंगात येणे, भूत घालवणे व व्यक्तीचा आजार पळवणे असे अंधश्रद्धेचे स्वरूप होते. आजार बरा होण्यासाठी तसेच पुत्रप्राप्तीसाठी देवतेला नवस बोलण्याची व

ते फेडण्याची प्रथा समाजात अस्तित्वात होती. पाश्चात्त्य व इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांना एक नवी दृष्टी मिळाली आणि सामाजिक रूढी-परंपरा व अंधश्रद्धा समाजाच्या लक्षात आल्यामुळे समाज परिवर्तन होऊ लागले.[२]

### १९ व्या शतकातील धार्मिक चळवळ:

भारतातील सामाजिक जीवनात जरी विषमता निर्माण झाली, तोच प्रकार धार्मिक जीवनाच्या बाबतीतही दिसून येतो. धर्माचे स्वरूप या काळामध्ये किचकट बनले होते किंवा बनत गेले होते. पूर्वी धर्माचे स्वरूप साधे आणि लोकांना समजण्यास सोपे होते. परंतु नंतरच्या काळखंडात धर्मामध्ये अनेक कनिष्ठ रूढी-परंपरांचा शिरकाव झाल्यामुळे धर्माचे स्वरूप बदलत गेले. या आर्थिक व धार्मिक रूढी-परंपरेनुसारच समाजाला वागणे बंधनकारक झाले. धर्माचे साधे स्वरूप अवघड झाले, त्याची जागा कर्मकांडाने घेतली. कर्मकांडामुळे सामान्य लोकांना विधी करणे अशक्य झाले आणि धार्मिक जीवनात गोंधळ निर्माण झाला; तसेच धर्माच्या नावाखाली समाजात अंधश्रद्धेचे प्राबल्य निर्माण झाले. त्याचबरोबर समाज सुधारणा चळवळीबरोबरच धर्म सुधारणा ही आवश्यक झाली.[३]

### सांस्कृतिक सुधारणा:

भारताचा इतिहास व त्याची संस्कृती प्राचीन आहे. येथील प्राचीन साहित्यसुद्धा मूल्यवान आहे. अनेक पाश्चात्त्य व भारतीय विद्वानांनी भारतातील भाषांचे अध्ययन करून येथील प्राचीन साहित्याचा शोध घेतला. त्यांनी मूळ साहित्याचे इंग्रजी भाषेत अनुवाद केले. तसेच भगवद्गीता व वेद या ग्रंथांचे अनुवाद इंग्रजी भाषेत झाले. पाश्चात्त्य लोकांचे अनुकरण करून भारतातील धार्मिक नेत्यांनी प्राचीन भारतीय साहित्याचे अध्ययन केले. जसे आगरकरांनी धार्मिक जीवनावर चिंतन करून लेखन केले. प्रेतसंस्कारापासून मूर्तीपर्यंतच्या सर्व हिंदू चालिरीतींना विरोध केला. तसेच आपल्या लेखात त्यांनी धर्माभोवती मानवाच्या आचरणावर व विचारांवर विरोध दर्शविला. असे मत मांडून धर्मविचारांची वाढ मानवी समाजात कशी झाली, हे त्यांनी स्पष्ट केले.४

### १९ व्या शतकातील आर्थिक परिस्थिती:

या काळात महाराष्ट्रात बहुतेक खेडी होती. ती सामाजिक व्यवहाराचे केंद्रबिंदू होती. शेती हाच या काळातील मुख्य व्यवसाय असून ती त्यांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन होती. लागवडीखालील असलेली जमीन व पडीक जमीन, हे जमिनीचे दोन प्रकार होते. शेती निसर्गावर अवलंबून होती. निसर्ग कोपला तर दुष्काळ पडत असे. दुष्काळप्रसंगीसरकार शेतकऱ्यांना मदत करण्याच्या बाबतीत उदासीन असे. शेतीत खरीप हंगामात विविध प्रकारची पिके घेण्यात येत असत. पाणीपुरवठा करण्यासाठी तलाव व धरणे बांधली जात असत. मोठ्या-मोठ्या नद्या अडवून धरणे बांधली जात असत. तसेच या काळात मध्यमहाराष्ट्रात विविध प्रकारचे व्यवसाय केले जात असत. शेती व पशुपालन हे प्रमुख व्यवसाय होते. त्याचबरोबर उद्योगधंद्यांत विविध व्यवसाय होते. ईस्ट इंडिया कंपनीने व्यापारासाठीच भारतात प्रवेश केला होता, आपली मक्तेदारी व नियंत्रण प्रस्थापित केले होते. त्यामुळे महाराष्ट्रातील पारंपरिक व्यवसाय, उद्योग व धंदे बंद पडले आणि या काळात लोखंड, पोलाद, ताग उद्योग, नीळ, सुती कापड उद्योग विकसित झाले. मुंबई, नागपूर, ठाणे, सातारा, कोल्हापूर, औरंगाबाद व पुणे ही या काळात लहान-मोठ्या उद्योगांची केंद्रे बनली. एकंदरीत आर्थिक कारणांमुळे १९ व्या शतकात आर्थिक सुधारणांचे वारे वाहू लागले.[५]

### १९ व्या शतकातील शैक्षणिक परिस्थिती:

१९ व्या शतकापर्यंत महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीमुळे शिक्षणाचा फार मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार झाला. परंतु यापूर्वी महाराष्ट्र हा शैक्षणिक दृष्टीने अत्यंत मागासलेला होता. विद्या प्रसाराचे मिशनऱ्यांचे कार्य कोणत्याही हेतूने असेना, परंतु त्यामधूनच पुढे कनिष्ठ वर्गातील मुला-मुलींच्या शिक्षणाची सोय झाली. एल्फिन्स्टन व जॉन माल्कम यांनी जे शैक्षणिक धोरण आखले, त्यानुसार स्थानिक लोकांना शिक्षण देऊ केले. शिक्षणाची जबाबदारी मिशनऱ्यांकडे सोपवू नये, असे एल्फिन्स्टनला वाटत होते. म्हणून त्यांनी श्रावण

महिन्यात ब्राह्मणांना वाटण्यात येणाऱ्या दक्षिणेऐवजी, पुढे चालून 'दक्षिणा-फंड' उभारून इ.स. १८२१ साली पुण्यातील विश्रामबाग वाड्यात 'संस्कृत पाठशाला' सुरू केली. पुढे या शाळेत इंग्रजी शिक्षणाची सोय करण्यात आली. त्याचबरोबर मुंबईत इंग्रजी शिक्षणाची शाळा काढली आणि पुण्यात स्वतंत्र इंग्लिश शाळा काढली.

### सारांश:

सामाजिक सुधारणा चळवळीमुळे महाराष्ट्रात समताधिष्ठित व विवेकी समाजाची निर्मिती झाली. याचाच परिणाम म्हणून महाराष्ट्रात सक्षम व सुदृढ समाजाची निर्मिती होण्यासाठी पायाभरणी झाली. त्याचबरोबर समाजव्यवस्थेत अनेक जाती, उपजाती आणि जमाती होत्या. प्रत्येक जातीच्या रूढी-परंपरा वेगवेगळ्या होत्या. याशिवाय त्यांच्यात श्रेष्ठ-कनिष्ठपणाची भावना अस्तित्वात होती. त्यामुळे त्यांच्यात सामाजिक एकोपा राहिला नव्हता; परंतु सुधारणा चळवळीमुळे त्यांच्यात ऐक्य घडून येण्यास मदत झाली. कोणताही मानव उच्च-नीच नाही, तसेच समाजातील जाती-उपजाती व जमाती यांच्यातही श्रेष्ठ-कनिष्ठपणाची भावना असू नये, कारण संपूर्ण मानवजात समान आहे; असा सुधारकांच्या विचारानुसार वागण्याचा त्यांनी प्रामाणिक प्रयत्न केला. त्यातून सामाजिक ऐक्य वाढीस लागले. त्याचप्रमाणे पाश्चात्त्य देशांच्या तुलनेत भारत फार मागे राहिला असल्याची जाणीव समाजसुधारकांना झाली. त्यामुळे पाश्चात्त्य देशांच्या बरोबरीने भारताला प्रगत करायचे असेल, तर भारतात पाश्चात्त्य पद्धतीनुसार इंग्रजी शिक्षण सुरू करणे आवश्यक आहे असे सुधारकांना वाटले. त्यामुळे भारतात इंग्रजी शिक्षण सुरू करण्याचा आग्रह केला. त्यामुळे इंग्रजांनी भारतात मुंबई व पुणे या ठिकाणी सर्वांसाठी इंग्रजी शिक्षण सुरू केले. त्यातूनच भारतीयांना लोकशाही, उदारमतवाद, व्यक्तीस्वातंत्र्य इत्यादी तत्त्वांचा परिचय झाला. त्याचप्रमाणे आर्थिक क्षेत्रातसुद्धा सुधारणा होऊन भारतीय लोकांना आपल्या दारिद्र्याची जाणीव झाली. या दारिद्र्याच्या कारणांचा शोध घेतल्यानंतरच त्यांच्या लक्षात आले की, केवळ शेतीवर अवलंबून न राहता भारतात उद्योगधंद्यांचा विकास झाला पाहिजे. यामागे १९ व्या शतकातील समाजसुधारणा चळवळीचे महत्त्व आहे.

### संदर्भ :-

१) रामभाऊ मुटकुळे, विजय कुलकर्णी, साईनाथ शेटोड - *महाराष्ट्रातील समाजसुधारक आणि प्रबोधन चळवळ*, अरूणा प्रकाशन, लातूर, पृष्ठ क्र. ७, ८.

२) अनिल कठारे - *आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र. ६८, ६९.

३) अनिल कठारे - *आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र. ७५, ७७.

४) अनिल कठारे - *आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, पृष्ठ क्र. ३७.

५) कित्ता - पृष्ठ क्र. ९१.

### संदर्भ ग्रंथ :-

१) भिडे जी.एल., पाटील एन.डी. - *महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास*.

२) संपा. गगुडकर मा.प. - *महाराष्ट्रातील समाज प्रबोधन आणि छत्रपती शाहू महाराजांचे कार्य*.

३) रामभाऊ मुटकुळे - *मध्ययुगीन भारताचा इतिहास*, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

४) अनिल कठारे - *भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास*, एज्युकेशनल पब्लिकेशन, औरंगाबाद.

५) कुलकर्णी अ.रा. - *महाराष्ट्र समाज आणि संस्कृती*, डायमंड प्रकाशन, पुणे - २००८.

६) फडके रा. वि. - *विसाव्या शतकातील महाराष्ट्र*, के सागर पब्लिकेशन, पुणे.

७) अनिल कठारे - *आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास*, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.

८) अनिल कठारे - *महाराष्ट्रातील समाजसुधारक*, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.

९) कीर धनंजय - *महात्मा ज्योतिबा फुले*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

१०) अनिल कठारे - *महाराष्ट्रातील राजकीय सामाजिक चळवळीचा इतिहास १८१८-१९६०*, विद्या बुक्स पब्लिकेशन, औरंगाबाद.

११) अ.रा. कुलकर्णी - *महाराष्ट्र समाज आणि संस्कृती*, डायमंड पब्लिकेशन, पुणे.